# अमरावतीचे तापमान घसरले 9.8 अंशावर

## जिल्हा गारठला, मेळघाटात सर्वात कमी तापमान

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.8 )-** तीन दिवसाच्या उबदार वातावरणानंतर बुधवारी रात्रीसोबत दिवसाचाही पारा मोठ्या फरकाने खाली घसरला. अमरावतीमध्ये मंगळवारी 13.7 अंशावर असलेले किमान तापमान 24 तासात 5.5 अंशाने घसरत 9.8 अंशावर आले. पारा घसरण्यासह उत्तरेकडून वाहणाऱ्या थंडगार वाऱ्यामुळे अंगाला झोंबणारा गारठा जाणवायला लागला आहे. विशेष म्हणजे दिवसाही किमान थंडीची जाणीव होत आहे.



हवामान विभागाच्या अंदाजानुसार बुधवारी विदर्भातील सर्व जिल्ह्यात कमाल व किमान तापमान खाली घसरले. अमरावती विभागातील 9 अंश किमान तापमानासह यवतमाळ जिल्हा सर्वाधिक गारठला आहे. याशिवाय अमरावती व बुलढाणा 9.8 अंशावर घसरले आहेत. अकोला 4 अंशाने घसरत 11 अंशावर आले आहे. विदर्भातील बहुतेक जिल्ह्यात रात्रीचा पारा 24 तासात 3 ते 5 अंशाने खाली घसरला आणि सरासरीपेक्षा 2 ते 4 अंशाने कमी आहे.उत्तर भारताच्या बहुतेक राज्यात थंडीची लाट कायम आहे व डझनभर राज्यात धुके पसरले आहेत. उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यामुळे विदर्भासह महाराष्ट्रातील बहुतेक जिल्हे थंडीच्या प्रभावात आहेत. त्यानंतर मात्र बदलत्या स्थितीमुळे ढगाळ वातावरण निर्माण होवून थंडीचा प्रभाव काहीसा कमी होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

### रात्री गारठा, दिवसा चटका

उत्तरेकडील थंड वारे महाराष्ट्राकडे येऊ लागल्याने राज्यात गारठा वाढला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानाचा पारा 10 अंशांच्या खाली घसरला आहे. राज्याच्या किमान तापमानात आणखी घट होण्याची शक्यता असल्याने दोन दिवसांत थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.पश्चिमी चक्रावातामुळे उत्तरेकडील राज्यांमध्ये हलक्या पावसासह हिमालयालगतच्या भागात हिमवृष्टी होत आहे. यातच उत्तर भारतातील राज्यांमध्ये थंडीचा कडाका सातत्याने कमी-अधिक होत आहे. राज्यात आकाश निरभ्र होत, स्वच्छ सूर्य प्रकाश जमिनीवर येत असल्याने कमाल तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे सकाळी गारठा आणि दुपारच्या वेळी उन्हाचा चटका जाणवत आहे.



# जिल्ह्यात 41 सौर प्रकल्पातून होणार 184 मेगावाट ऊर्जा निर्मिती

## नारगावंडी सौर प्रकल्पाच्या कामाची जिल्हाधिकारी यांनी केली पाहणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.8 )** - मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 योजनेत शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यात 41 उपकेंद्रासाठी 184 मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्पाचे 7 ठिकाणी काम सुरू झाली आहेत. उर्वरित कामे तातडीने सुरू होणार आहे.शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेला जिल्ह्यात गती देण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्याकडून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद संजीता मोहपात्रा, महावितरणचे मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी, अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, सर्व कार्यकारी अभियंते, विभागीय महाव्यवस्थापक (महाऊर्जा) तायडे आणि सौर ऊर्जा प्रकल्प विकासक उपस्थित होते. मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रारंभ झालेल्या या शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पामुळे कृषी पंपांना दिवसा, अखंडीत व शाश्वत वीजपुरवठा शक्य होणार आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठी 840 एकर शासकीय जमीनीचे अधीग्रहन करण्यात आले आहे. या जमीनिवर 44 ठिकाणी 41 उपकेंद्रासाठी विकेंद्रीत सौर प्रकल्प उभारून या प्रकल्पातून 184 मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येणार आहे. तथापि या योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणी तत्काळा सोडविण्यासंदर्भात जिल्हयातील सर्व तहसिलदार यांना सुचित करून मदत करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी अवगत केले.

### 2025 पर्यंत प्रकल्पाचे काम होणार पूर्ण

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत धामणगाव तालुक्यातील नारगावंडी येथे प्रगतीपथावर असलेल्या सौर प्रकल्पाच्या कामाची जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांनी 8 जानेवारी रोजी प्रत्यक्ष पाहणी केली आणि मार्च 2025 पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत प्रकल्प विकासकांना आदेश दिलेत. यावेळी चांदुर रेल्वेचे महसुल उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, धामणगाव (रेल्वे), तहसीलदार अभय घोरपडे महावितरणाचे अधिक्षक अभियंता दिपक देवहाते, कार्यकारी अभियंता अनिरूध्द आलेगावकर,तसेच सर्व विकासक हजर होते.

# चांगल्या सुविधांमध्ये अमरावती जिल्हा महिला रुग्णालय राज्यात दुसरे

## राज्यभरातील शासकीय महिला रुग्णालयांची यादी जाहीर




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8) -** आरोग्य विभागाने ऑक्टोबर 2024 मध्ये आयोजित केलेल्या आरोग्य निर्देशांकात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या उत्तम सेवेमुळे जिल्हा शासकीय महिला रुग्णालय (डफरीन) राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आले आहे.

राज्यभरातील आरोग्य संस्थांमार्फत आरोग्य सेवा पुरविल्या जातात. त्या सेवा सुविधांचा रुग्णांना किती फायदा होतो? रुग्ण समाधानी आहे का? प्रसूतीदरम्यान गर्भवती महिलांना कोणत्या सेवा दिल्या जातात? अशा प्रकरणांची चौकशी केली जाते. या आधारावर रुग्णालयांचे वर्गीकरण केले जाते. जिल्ह्यातील महिला रुग्णालय 82 गुण मिळवून दुसऱ्या स्थानावर आहे. परभणी जिल्हा महिला रुग्णालयालाही तेवढेच गुण मिळाले आहेत. मात्र, प्रतवारीच्या बाबतीत अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाला यादीत दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. अकोल्याच्या जिल्हा महिला रुग्णालयाने 95 गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्यातील महिला रुग्णालयांना आरोग्य सेवेचा आढावा घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागाकडून गुण दिले जातात. ही तपासणी अचानकपणे आणि कोणतीही माहिती न देता केली जाते. यामध्ये सर्वात कमी गुण मिळालेल्या मागील पाच जिल्हा महिला रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकांना वैद्यकीय सेवा सुविधांबाबत जनजागृती करण्याबरोबरच आरोग्य सेवा सुधारण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# लग्नाचे आमिष दाखवून विधवा महिलेवर लैंगिक अत्याचार

## खोलापुर ठाण्यात गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.8 )** - खोलापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका विधवा महिलेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करण्यात आला. ही घटना 2022 ते 7 जानेवारी 2025 दरम्यान घडली. महिलेच्या तक्रारीवरून खोलापूर पोलिसांनी 7 जानेवारी रोजी आरोपी रोशन श्रीकृष्ण ठाकरे (35, रा. म्हैसपूर, भातकुली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

तक्रारदार महिलेच्या पतीचा मृत्यू झाल्यामुळे ती आईच्या घरी राहत होती. दरम्यान, 2022 मध्ये त्यांची फोनवरून आरोपी रोशन ठाकरेसोबत ओळख झाली होती. त्यावेळी मला तू खूप आवडतेस, मी तुझ्याशी लग्न करेन, असे सांगून आरोपीने महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर रोशनने महिलेला अमरावती येथे भाड्याने घर मिळवून दिले आणि ते दोघेही पती-पत्नीसारखे एकत्र राहू लागले. दरम्यान, आरोपी रोशन याने महिलेसोबत अनेकवेळा बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. मात्र महिलेने लग्न करण्याचे बोलले असता आरोपी रोशनने नकार देण्यास सुरुवात केली. ज्याची फिर्याद महिलेने खोलापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. पोलिसांनी रोशन ठाकरेविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# शेतातील तूरीच्या गंजीला लागली आग

## 70 हजार रूपये किंमतीचे अंदाजे 16 क्विंटलचे तूरीचे नुकसान

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.8 )** - शेतात ठेवलेल्या अंदाजे 16 क्विंटल तूरीच्या गंजीला आग लागुन शेतकर्याचे 70 हजार रूपयाचे नुकसान झाले. ही घटना चांदूर रेल्वे तालुक्यातील नेकनानपूर शेत शिवारात मंगळवारी रात्री घडली. अग्निशमन दलाने या आगीवर नियंत्रण मिळविल्यामुळे इतरत्र आग पसरण्याचा धोका टळला.



शेतकरी मो. आसिफ मो. खलिल यांचे चांदूर रेल्वे ते तळेगाव दशासर मार्गावर डी लाईट हॉटेलच्या मागे 800 मिटर अंतरावर नेकनानपूर शेत शिवारात शेत आहे. दूपारी त्यांनी शेतातील तूर सोंगून अंदाजे 16 क्विंटल तूरीच्या पेंड्यांची गंजी मारून ठेवली होती. शेतात रानडुकरांचा त्रास असल्याने रात्री 8 वाजता दरम्यान ते शेतातून चक्कर मारून घरी गेले. रात्री 8.45 वाजता दरम्यान त्यांच्या शेतात आगीचे लोट दिसत असल्याचे डी लाईट हॉटेलच्या मालकांनी फोनवरून सांगीतले. मो.आसिफ त्वरीत शेतात पोहचले असता तूरीची गंजी जळत होती. या घटनेची माहिती अग्निशमन दल व चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनला फोनवरून कळविले. अग्निशमन दलाची गाडी त्वरीत घटनास्थळी पोहचली आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविल्यामुळे आग इतरत्र पसरण्याचा धोका टळला. मात्र या आगीत शेतकरी मो.आसिफ यांचे 70 हजार रूपयांची तूर खाक झाली. चांदूर रेल्वे पोलिसही घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी या घटनेचा स्थळ पंचनामा केला. त्यांना त्वरीत आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी मो.आसिफ यांनी शासनाकडे केली आहे.

# 119 मॉडिफाय सायलेंसर, 78 प्रेशर हॉर्नवर फिरविला बुलडोजर

## पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनात वाहतुक विभागाची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.8 )-** वाहतुक विभागाने जप्त केलेले 119 मॉडीफाय सायलेंसर व 78 प्रेशर हॉर्न रोड रोलर फिरवुन नष्ट करण्यात आले. 8 जानेवारी रोजी पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनात पोलीस वर्धापन दिन कार्यक्रमादरम्यान ही कार्यवाही करण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात वाहतुक विभागाने केलेल्या कार्यावाहीतील जप्त 119 मोडीफाय सायलेंसर व 78 प्रेशर हॉर्न पोलीस मुख्यालय येथे रोड रोलर फिरवुन नष्ट करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे तसेच सर्व सहायक पोलीस आयुक्त, ठाणे व शाखा प्रभारी अधिकारी, पोलीस अंमलदार व शांतता समीती, मोहल्ला समीतीचे सदस्य - फिर्यादी, मुळ मालक गणेश व दुर्गोत्सव मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### 21 लाख 83 हजार 900 रुपयांचे मोबाईल केले परत

शहरातील दहा पोलीस स्टेशन व सायबर गुन्ह्यामध्ये आरोपींकडून जप्त केलेला मुद्देमाल कोर्टाचे आदेशाने मुळ मालकास पोलीस आयुक्त यांचे हस्ते परत करण्यात आले. ज्यामधे जावरे ज्वेलर्स येथील दरोड्यातील चांदी व गाडगेनगर हद्दीतील घरफोडीतील सोने व मोटारसायकल चोरीचे गुन्ह्यातील मोटार सायकल मुळ मालकास परत करण्यात आली. सायबर गुन्हयात फसवणुक / हरविलेले मोबाईल हॅन्डसेट असा एकुण 21 लाख 83 हजार 900 रुपयांचा माल मुळ मालकास परत करण्यात आला व काही रुपये फ्रिज करण्यात आले.

### राजापेठ ठाण्याला स्वच्छ व सुंदर पोलिस स्टेशनचा मान

पोलीस वर्धापन दिन औचित्य साधुन स्वच्छ व सुंदर पोलीस स्टेशन राखणेकरिता आयोजित स्पर्धेतील उत्कृष्ट तीन पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना प्रशस्तिपत्र व चषक देवुन गौरविण्यात आले. त्यामधे उत्कष्ट पोलीस स्टेशनमधे प्रथम क्रमांक राजापेठ पोलीस स्टेशन द्वितीय क्रमांक व बडनेरा तृतीय क्रमांक भातकुली पोलीस स्टेशनला देण्यात आला.

### साउरचे बालगणेश उत्सव मंडळ प्रथम

पर्यावरण पुरक गणेश मंडळ व दुर्गा मंडळ स्पर्धेतील विजेते यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देवुन त्यांना पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांचे हस्ते प्रशस्तीपत्र व चषक देवुन गौरविण्यात आले. गणेश मंडळामधे आयुक्तालय स्तरावर प्रथम क्रमांक बालगणेश उत्सव मंडळ साऊर, द्वितीय क्रमांक श्री बजरंग गणेश उत्सव मंडळ पटवीपुरा व तृतीय क्रमांक जयहिंद गणेशोत्सव मंडळ, बारीपुरा, यांना देण्यात आला. आयुक्तालय स्तरावरील नवदुर्गा मंडळे यातील स्पर्धेतील प्रथम क्रमांक एकता सार्वजनिक नवदुर्गोत्सव मंडळ, आसरा, द्वितीय क्रमांक श्री. अंबानगरी नवदुर्गोत्सव मंडळ, भाजीबाजार, तृतीय क्रमांक झिरी दुर्गोत्सव मंडळ, झिरी परिसर यांचा गौरव करण्यात आला. तसेच विभाग निहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गणेश मंडळ व दुर्गा मंडळ यांना सुद्धा गौरविण्यात आले. स्पर्धेकरिता लाभलेले परिक्षक मंडळातील पदाधीकारी अजय गाडे, विनायक ठाकरे, पल्लवी शिंदे, प्रतिभा तेटु, आर. बी. गुजर यांना सुद्धा प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले.

# कक्षसेवकाला मारहाण करणाऱ्याला दहा हजाराचा दंड

## वरुड ग्रामिण रुग्णालयातील 2015 मधील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.8 )-** वरुड येथील ग्रामीण रुग्णालयात कर्तव्यावर असणाऱ्या कक्षसेवकाला मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या एका आरोपीला न्यायालयाने 10 हजाराच्या दंड व दंड न भरल्यास सहा महिन्याचा कारावास, अशी शिक्षा सुनावली आहे.

युवराज उर्फ बंडू वासुदेवराय सोनारे (43, रा. गाडेगाव ता. वरूड, जि. अमरावती) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. वरुड येतील जिल्हा सत्र न्यायाधीश ए.एस.आवटे यांच्या न्यायालयाने 7 जानेवारी रोजी हा निकाल दिला. विधी सुत्रानुसार, रविकांत साहेबराव यावले हे वरूड ग्रामीण रुग्णालयात कक्ष सेवक पदावर कार्यरत होते. 8 ऑक्टोंबर 2015 रोजी कक्ष सेवक रविकांत व त्यावेळी हजर असलेले डॉक्टर आपल्या कर्तव्य बजावित होते. त्यावेळी रविकांत हे ग्रामीण रुग्णालयाच्या बाहय रुग्ण



विभागात चिठ्ठी देत होते. दरम्यान आरोपीने रुग्णाच्या पाच चिठ्ठ्या मागितल्या आणि त्याने रविकांत यावलेंसोबत वाद केला. त्यानंतर आरोपीने रविकांत यांच्या गालावर मारले. त्यामुळे त्यांच्या नाकाला दुखापत झाली होती. या घटनेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास पूर्ण करून, न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या न्यायालयासमक्ष सरकार पक्षातर्फे आरोपांचा गुन्हा सिद्ध करण्याच्या अनुषंगाने एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. त्यानंतर दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर आरोपीविरुद्ध भादंविची कलम 186, 332, 353 नुसार गुन्हा सिध्द झाले. त्यानुसार जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. आवटे यांनी आरोपी युवराज उर्फ बंडू वासुदेवराव सोनार यांस कलम 332 अंतर्गत 5 हजाराचा दंड, व दंड न भरल्यास सहा महिने साधा कारावास तसेच कलम 353 अंतर्गत 5 हजाराचा दंड व दंड न भरल्यास सहा महिने साधा कारावास, याप्रमाणे एकुण 10 हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. सदरच्या फौजदारी प्रकरणात सरकारच्या वतीने अतिरीक्त शासकिय अभियोक्ता ॲड. शशिकिरण भगवतीप्रसाद पलोड यांनी सरकारच्या वतीने बाजु मांडली व त्यांना कोर्ट पैरवी सहकार्य केले. वरुडच्या पोलिस हवालदार पुनम डाहाके आणि अरूण हटवार यांनी सहकार्य केले.

# हे सरकार भांडवलशाहीचे, त्यांना शेतकऱ्यांशी देणघेणे नाही!

## काँग्रेस नेत्या ॲड .यशोमती ठाकूर यांचे घणाघात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8) -** आज भांडवलशाहीचे सरकार असून या सरकारला शेतकऱ्यांशी काहीच देणे घेणे नाही, महाविकास आघाडीचे सरकार असताना तुरीला 12000 रुपये प्रति क्विंटल प्रमाणे भाव मिळत होता आणि आज त्याच तुरीचे भाव सात हजारापर्यंत गडगडले आहे. यावरून सरकार कोणाचे भले करत आहे, हा प्रश्न निर्माण झालेला आहे, सोयाबीन आणि कापसाला भाव नाही आणि आज तर तुरीलाही भाव नाही, अशी बिकट परिस्थिती शेतकऱ्यांची झालेली आहे, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या समस्यांकडे पाहण्यासाठी वेळ नाही, हे सरकार भांडवलशाहीचे आहे, असे प्रतिपादन काँग्रेस नेत्या ॲड. यशोमती ठाकूर यांनी केले आहे.

त्यापुढे म्हणाल्या, या सरकारला फक्त शेतकऱ्यांचे मरणच दिसत आहे. दुसरे काहीच नाही. अमरावतीत शेतकऱ्यांची तूर बाजारात येण्यापूर्वीच भाव चार हजारांनी गडगडले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग झाला, तुरीला दहा ते अकरा हजार रुपये प्रति क्विंटल चा भाव होता, कपाशी व सोयाबीन मध्ये झालेले नुकसान काही प्रमाणात भरून निघेल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. मात्र या अपेक्षेचा भंग



झालेला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात शेतमालाला भाव होते, मात्र सरकारला फक्त शेतकऱ्यांचे मरणच समजते, असा घणाघात ॲड. यशोमती ठाकूर यांनी केला.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

